संशोधनाचा आराखडा

।। संशोधन विषय ।।

‘‘विद्रोही जाणिवा आणि अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय : एक चिकित्सक अभ्यास’’

कला विभागातील मराठी विषयातील पीएच.डी. या पदासाठी सादर करावयाच्या प्रबंधाचे प्रारूप.

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

संशोधक

बेटकर वैशाली चनबस

मु. पो. देवणी ता. देवणी जि. लातूर

मो. नं. 9405043370

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजकुमार मस्के

विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग, उदगीर

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

ता. उदगीर जि. लातूर पीन नं. 413517

मो. नं. 9890596255

'' विद्रोही जाणिवा आणि अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मय एक चिकित्सक अभ्यास''

अनुक्रमणिका

प्रस्तावना

विषय निवडीची भूमिका

संशोधनाची उद्‌दिष्टे

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा

संशोधन विषयाचे महत्त्व

प्रकरणे

1. अण्णा भाऊ साठे यांचे जीवन व कार्य
2. अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य लेखनाची प्रेरणा व स्वरूप
3. विद्रोहाची संकल्पना, स्वरुप आणि प्रेरणा
4. अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील विद्रोही जाणिवा
5. अण्णा भाऊ साठे यांच्या कथा साहित्यातील विद्रोही जाणिवा.
6. अण्णा भाऊ साठे यांच्या प्रवास वर्णनातील विद्रोही जाणिवा.
7. निष्कर्षात्मक विवेचन.

प्रस्तावना : मराठी साहित्य शारदेच्या विश्वातील एक तळपता सूर्य, उपेक्षित माणसाची माणूसकी शोधणारे एक प्रतिभावंत साहित्यिक म्हणजेच अण्णा भाऊ साठे होय. लोकनाटयाचे जनक, एक दर्जेदार कथाकार व लोकप्रिय कादंबरीकार, नाटककार, लोकशाहिर म्हणून त्यांची ओळख आहे. अण्णा भाऊ साठे यांनी विविध वाङःमय प्रकार सहजपणे हाताळले.

उपेक्षित मातंग समाजात अण्णा भाऊ साठे यांचा जन्म झाला. प्रतिभावंत अण्णांनी जे जीवन अनुभवले, पाहिले तेच साहित्यातून साकार केले. म्हणूनच अण्णा भाऊ म्हणतात, ‘माझी माणसं मला कुठं ना कुठंतरी भेटलेली असतात. दलित लोकांना मिळणारी वागणूक, त्यांचे उपेक्षित जगणे साहित्यातून अण्णा भाऊंनी चित्रित केले. दलित व्यक्तिला वर्ण व्यवस्थेने समाजाचा एक हीन घटक मानले; पण अण्णा भाऊंनी या माणसांना साहित्य शारदेच्या विश्वात मानाचे स्थान दिले, तेंव्हापासून हे उपेक्षितांच जिणं अभ्यासकाचे अभ्यास विषय बनले.

अण्णा भाऊंनी आपल्या साहित्यांतून उपेक्षित असलेल्या, समाजाच्या दृष्टीने, गुन्हेगार असणाऱ्या लोकांना नायकत्व बहाल केले. स्त्रीचे शील, पुरुषांचा पराकम आणि राष्ट्राविषयी स्वाभिमान अशी तिहेरी भूमिका घेऊन अण्णा भाऊनीं लेखन केले आहे.

विषय निवडीची भूमिका : –

शिक्षण घेत असताना पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रमात ‘ एका लेखकाचा अभ्यास : अण्णा भाऊ साठे’ असा पेपर होता. हा पेपर अभ्यासत असतानाच अण्णा भाऊ साठे या लेखकाने मनात घर केले. दलित साहित्याच्या मुळाशी वेदना, विद्रोह आणि नकार ही त्रिसूत्री दिसते.

अण्णा भाऊंच्या साहित्यातील नायक हे उपेक्षित वर्गातील आहेत. गरीब, पोटासाठी राबणारे समाजाने उपेक्षिलेले आहेत, पण ते स्वाभिमानी, पराक्रमी, देशाविषयी स्वाभिमान बाळगणारे दिसून येतात. बिकट परिस्थितीतही ते आपल्या तत्त्वाला गहाण ठेवत नाहीत. स्त्रीचं शील जपतात. अण्णा भाऊंनी जे जीवन जगलं, भोगलं, अनुभवल आहे आणि तेच त्यांनी साहित्यातून मांडल आहे. अशा मानवतावादी असणाऱ्या साहित्यिकांचा अभ्यास करण ही एक आनंदाचीच बाब आहे. अण्णा भाऊंच्या साहित्यातील विद्रोही जाणीवा कशा आहेत याचा शोध घेण्यासाठी मी हा विषय मार्गदर्शकांशी चर्चा करून निवडला आहे.

संशोधन उदिद्ष्टे :–

1960 नंतर दलित साहित्याला सुरुवात झाली. दलित साहित्यामध्ये सुवर्णअक्षरात कोरलेले नाव म्हणजे अण्णा भाऊ साठे. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य कृतीतील विद्रोही जाणिव कोणत्या स्वरुपाच्या आहेत याचा शोध त्यांच्या कथा, कादंबरी व प्रवासवर्णन इ. असे विविध वाङ्मय प्रकारातून घेणार आहे.

अण्णा भाऊंनी उपेक्षितांचे जीवन अनुभव कसे मांडले आहे, त्यांच्या साहित्यांचे वेगळेपण सांगणे आणि त्यांच्या साहित्यातील विद्रोही जाणिवेचा चिकित्सक पणे अभ्यास करणे ही उद्दिष्टे या संशोधनामागे आहेत.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :–

अण्णा भाऊ साठे म्हणजेच दलित साहित्यातील एक विशाल वटवृक्ष. त्यांच्या साहित्यकृतीचा सर्वच अंगाने अभ्यास करणे हे खूपच व्यापक आहे. पण मी 'विद्रोही जाणिवा आणि अण्णा भाऊ साठे यांचे वाङ्मयः एक चिकित्सक अभ्यास' हा विषय निवडून माझ्या संशोधनाची मर्यादा निश्चित केली आहे.

संशोधनाचे महत्त्व / उपयोगिता :–

आधुनिक मराठी साहित्यातून उदारमतवादी विचारसरणी प्रवाहित झालेली दिसून येते. गंगाधर गाडगीळ, शरच्चंद्र मुक्तिबोध, बाबुराव बागुल, रा. रं. बोराडे इ. मान्यवर साहित्यिकांनी विविध वाङ्‌मय प्रकार हाताळले; परंतु अण्णा भाऊ साठे यांनी मराठी साहित्यसृष्टीमध्ये अतिशय मौलिक अशी भर घातली आहे. उपेक्षित, कामगार, दलित, श्रमिक या लोकांकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. अण्णा भाऊ साठे यांच्यापूर्वी असे साहित्याच्या क्षेत्रात घडले नव्हते, म्हणून अण्णा भाऊचे साहित्य हे वैशिष्टपूर्ण ठरते.

प्रकरण 1 ले

अण्णा भाऊ साठे यांचे जीवन व कार्य

सदरील प्रकरणात अण्णा भाऊ साठेंचे जीवन व कार्यकर्तृत्वाचा सविस्तर विचार करावयाचा आहे. त्यांचे बालपण, तरूणपण, त्यांच्यावर झालेले आई–वडीलांचे तसेच समाजाचे संस्कार, तत्कालीन परिस्थितीमूळे लेखकाच्या जडणघडणीवर पडलेला प्रभाव आणि त्यांची विविध चळवळीत दिलेले योगदान यांचा अभ्यास या प्रकरणात करणार आहे.

प्रकरण 2 रे

अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्य लेखनाची प्रेरणा व स्वरूप

प्रस्तुत प्रकरणात अण्णा भाऊंच्या साहित्याची प्रेरणा स्पष्ट करणार आहे, त्यात मार्क्सवादी प्रेरणा, साम्यवादी प्रेरणा, आंबेडकरवादी प्रेरणा अशा विविध प्रेरणांचा अभ्यास करावयाचा आहे आणि त्यांच्या साहित्याचे स्परूप कसे आहे यात कथा, कादंबरी, प्रवासवर्णन इ. अशा विविध वाङ्मय प्रकाराचे स्वरूप अभ्यासावयाचे आहे.

प्रकरण 3 रे

विद्रोहाची संकल्पना, स्वरूप आणि प्रेरणा

सदरील प्रकरणात विद्रोह म्हणजे काय? विद्रोहाची संकल्पना, स्वरूप व प्रेरणा या घटकांचा विचार करावयाचा आहे.

प्रकरण 4 थे

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरीतील विद्रोही जाणिवा

या प्रकरणात कादंबरीची स्थूलमानाने स्वरूप, संकल्पना, या घटकांचा विचार करावयाचा आहे. कादंबरीतील स्त्रीपात्राचा येणारा विद्रोह, पुरूषपात्राचा असलेला विद्रोह, घटनाप्रसंगातून येणाऱ्या विद्रोही जाणिवेचा साधार शोध संशोधक घेणार आहे.

<u>प्रकरण 5 वे</u>

<u>अण्णा भाऊ साठे यांच्या कथा साहित्यातील विद्रोही जाणिवा</u>

सदरील प्रकरणात 'कथा' या वाङ्मय प्रकाराचे स्थुलमानाने संकल्पना आणि स्वरूप अभ्यासावयाचे आहे. कथेतून आलेल्या स्त्री– पुरूषांच्या विद्रोही जाणिवांचा शोध घ्यावयाचा आहे.

<u>प्रकरण 6 वे</u>

<u>अण्णा भाऊ साठे यांच्या प्रवासवर्णनातील विद्रोही जाणिवा</u>

सदरील प्रकरणात प्रवास वर्णन म्हणजे काय? घटक, प्रवास वर्णनाचे स्परूप व प्रेरणा स्थुलमानाने स्पष्ट करावयाची आहे. कथा, प्रसंग, संवाद, प्रवासवर्णन, वृत्तीप्रवृत्ती यातील विद्रोही जाणिवा या प्रकरणात अभ्यासावयाच्या आहेत.

<u>प्रकरण 7 वे</u>

<u>निष्कर्षात्मक विवेचन</u>

या प्रकरणात प्रकरण 1 ते 6 या प्रकरणाच्या अभ्यासातून निघालेले निष्कर्ष नोंदविण्यात येतील.

संदर्भसूची

1. अण्णा भाऊ साठे समाज विचार – डॉ. बाबुराव गुरव
2. अण्णा भाऊंचे कादंबरी विश्व – डॉ. प्रमोद गारोडे
3. अण्णा भाऊंचे समग्र वाङ्मय – महाराष्ट्र शासन प्रत
4. जननायक अण्णा भाऊ साठे – सं. शिवाजी जवळगेकर
5. सत्यशोधक अण्णा भाऊ साठे – मच्छिंद्र सकटे
6. अण्णा भाऊ साठे (समिक्षा ग्रंथ संपादन) – आसाराम गायकवाड
7. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्याचे मूल्यमापन – डॉ. माधव गादेकर
8. अण्णा भाऊ साठेचे साहित्य – नानासाहेब कठाळे
9. साहित्यसमीक्षा संदर्भ आणि वाटचाल – संपादन डॉ. सुशीलप्रकाश चिमारे व इतर
10. दलित कादंबरीतील स्त्री प्रतिमा – ज्योती लांजेवार

परिशिष्टे

लेखकाचे दुर्मिळ फोटो.

संशोधक

बेटकर वैशाली चनबस
मु.पो.देवणी ता. देवणी जि. लातूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. राजकुमार मस्के
विभाग प्रमुख, पदवी व पदव्युत्तर
मराठी विभाग उदगीर
महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,
उदगीर